**प्रेसनोट दिनांक २२/०६/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**खुळेवाडी चंदननगर पुणे येथे तपासकामी आलेले कोंढवा पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीसांवर हल्ला करुन फरार झालेले महिला आरोपींना विमानतळ पोलीस स्टेशनकडील पोलीसांनी सुमारे १० महिन्यानंतर अटक करुन गुन्हा उघडकिस आणुन उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत...**

दिनांक २५/०७/२०१८ रोजी सहा पोलीस निरीक्षक नितीन बोधे, पो ना ६५५४ कोळेकर, पो शि ८१४० क्षिरसागर, पो शि १०३६७ कांबळे, पो शि.८७६८ शेलार, असे कोंढवा पो.स्टे गुन्हा रजि नंबर ३४२/२०१८ भा.दं.वि कलम ३९२ या गुन्हयातील संशयीत आरोपीचा शोध घेणेकामी सरकारी कामासाठी दुर्गा माता मंदीराचे समोर खुळेवाडी चंदननगर पुणे येथे रात्रौ २१/३० वाजता आलेले असताना यातील खळेवाडी येथील लोकवस्ती मध्ये राहणारी महिला नामे सारीका दादाराव पवार,सविता बाबु देवकर, व इतर १० ते १२ लोकांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी सहा पोलीस निरीक्षक नितीन बोधे, व त्यांचे बरोबर असलेले वरील नमुद पोलीस कर्मचारी यांना तुम्ही येथे आमच्या लोकांना पकडुन न्यायला आले आहे काय? तुम्ही आमचे वस्तीजवळ थांबायचे नाही,तुम्ही येथुन निघुन जा असे म्हणुन मोठयाने आरडा ओरडा करुन फिर्यादी व त्यांचे बरोबर असलेला पोलीस स्टाफ यांचेबरोबर बाचाबाची करुन, शिवीगाळ करुन, फिर्यादी हे सरकारी काम करीत असताना सरकारी कामामध्ये अडथळा निर्माण केला म्हणुन फिर्यादी सहा पोलीस निरीक्षक नितीन बोधे,कोंढवा पोलीस स्टेशन पुणे यांनी तक्रार दिल्याने वरील प्रमाणे तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नंबर २२३/२०१८ भा दं वि कलम ३५३,१४३,१४७,५०४, प्रमाणे गुन्हा दाखल केलेला होता. सदरचा गुन्हा दाखल झाले पासुन आरोपी मजकुर हे त्यांचे दिलेले पत्त्यावर मिळुन येत नव्हते विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस त्यांचे मागावर होते.

दिनांक १०/०६/२१९ रोजी सहा पोलीस निरीक्षक श्री एम आर खोकले व तपास पथकातील कर्मचारी अशोक आटोळे, संजय आढारी, पुष्पेंद्र चव्हाण, महिला कर्मचारी साधना पवार, विशाल गाडे असे दुपारी विमानतळ पोलीस ठाणेचे हददीमध्ये पेट्रोलिग करीत असताना महिला नामे १.सारीका दादाराव पवार वय ३० वर्षे रा. खुळेवाडी चंदननगर पुणे, २.सविता बाबु देवकर वय ३५ वर्षे रा. सदर या विमाननगर चौकामध्ये मिळुन आल्याने सहा पोलीस निरीक्षक श्री खोकले यांनी त्यांना महिला कर्मचारी साधना पवार यांचे मदतीने ताब्यात घेवुन विमानतळ पोलीस स्टेशन पुण् येथे हजर करुन त्यांचेकडे सखोल तपास केला असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिल्याने त्यांना दिनांक १०/०६/२०१९ रोजी १६/४५ वाजता अटक करुन सदरचा गुन्हा उघडकिस आणुन वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे.**